# ठक्कर्स समूहातर्फे रोपांचे वाटप

नाशिक : ठक्कर्स समूहातर्फे १५ ऑगस्टपर्यंत रोपांचे मोफत वाटप ठक्कर्स बझार येथे तसेच त्र्यंबक रोडवर पीटीसीसमोर ठक्कर्स डोम येथे आणि इंडिगो पार्क, गोविंदनगर येथे होणार आहे. यानिमित्त शहरात वृक्षलागवड, रोपांचे वाटप व संगोपन यासंदर्भात ठक्कर्स बझार येथे एक कार्यक्रम झाला.

यावेळी ठक्कर्स समूहाचे अध्यक्ष जितेंद्र ठक्कर यांनी सांगितले की, ठक्कर्स उद्योग समूहाला ५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने एक लाख झाडे लावण्याचा आम्ही दोन वर्षांपूर्वी संकल्प केला होता. त्यापैकी ३५ हजार झाडांची लागवड पूर्ण झाली आहे. बाकी झाडांच्या लागवडीचे काम जोमाने पुढे चालविले जात आहे.

यापैकी काही झाडे एक व्यक्ती एक झाड या तत्त्वावर लावून त्यांचे संगोपन करणे सध्या सुरु आहे. यावेळी सामाजिक वनीकरण उपसंचालक पी. एन. पाटील एस.टी. विभाग नियंत्रक सी. वाय. के. जोशी क्रेडाई नाशिकचे अध्यक्ष जयेश ठक्कर, किरण चव्हाण, सुनील गावंडे, अमित रोहमारे, प्रवीण पाटील, संजय लचके, योगेश सातपुते आदि उपस्थित होते.

(वाणिज्य प्रतिनिधी)